# पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.०८/०७/२०१९
## दि.०७/०७/२०१९ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | बंडगार्डन पो स्टे २८४/१९,भादविक ३०२ |
| **फिर्यादी** | दिवाकर डाहाट,वय-४७,रा.रेल्वे पार्किंग,पुणे रेल्वे स्टेशन,पुणे येथे |
| **आरोपी** | करीम ऊर्फ मुन्ना सलीम पिरजादे,वय-४०,रा.घर नं.३१,गल्ली नं.३७,ताडीवाला रोड,पुणे (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०७/०७/२०१९ रोजी १८/३० ते १९/०० वा.चे दरम्यान जुने डी.आर.एम. ऑफिसचे समोर रस्त्याचे पार्किंग बाजुचे फूटपाथवर |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे सदर ठिकाणी रेल्वे पार्किंग मध्ये मजुरीचे काम करतात. ते सदर ठिकाणी काम करीत असताना,यातील नमुद इसम करीम पिरजाने याने एक अनोळखी फिरस्ता असाध्य रोग असलेल्या इसमास अज्ञात कारणावरून,जीवे ठार मारण्याचे उद्देशाने,त्याचे डोक्यात सिमेंटचे ब्लॉकने मारुन,गंभीर जखमी करुन,जीवे ठार मारले आहे. |
| **त.अंमलदार** | पो.निरी.(गुन्हे) डी.बी.शिंदे ९८२३८७८८११ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | कोथरूड पो स्टे २२५/१९,भादविक ३८०,४५७,५११ |
| **फिर्यादी** | प्रियदर्शनी कारखानीस,वय-५० वर्षे,रा.आयडीयल कॉलनी,पौड रोड,कोथरुड,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०६/०७/२०१९ रोजी २०/०० वा.ते दि.०७/०७/२०१९ रोजी पहाटे ०५/०० वा.चे दरम्यान फिर्यादीचे राहते घरी |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचा राहता फ्लॅट कुलुप लावुन बंद असताना,कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांचे राहते घराचे चनेल गेटचे लॉक तोडुन,त्यावाटे आंत प्रवेश करून, बेडरूम मधील दोन्ही लोंखडी कपाटातील लॉकर उचकटुन त्यामधील सामान अस्ताव्यस्त करून,घरफोडी चोरी करण्याचा प्रयत्न केला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. बी.पी.शेळके ८८८८८५०२५६ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | कोथरूड पो स्टे २२६/१९,भादविक ४५४,४५७,५११ |
| **फिर्यादी** | विष्णु गंधे,वय-५७ वर्षे,रा.मुधराज नगर,पौड रोड,कोथरुड,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०६/०७/२०१९ रोजी सकाळी ११/०० वा.ते दि.०७/०७/२०१९ रोजी सकाळी ११/०० वा.चे दरम्यान फिर्यादी यांचे राहते घरी |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचा राहता फ्लॅट कुलुप लावुन बंद असताना,कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांचे राहते घराचे चनेल गेटचे लॉक तोडुन,त्यावाटे आंत प्रवेश करून,घरफोडी चोरी करण्याचा प्रयत्न केला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. बी.पी.शेळके ८८८८८५०२५६ |

४

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | येरवडा पो स्टे ४९०/१९,भादविक ४५४,४५७,३८० |
| **फिर्यादी** | कॅतरीन कुमार,वय-५६ वर्षे,रा.कल्याणीनगर,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात |

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** दि.०६/०७/२०१९ रोजी १३/३० वा.ते दि.०७/०७/२०१९ रोजी ०९/५० वा.चे दरम्यान फिर्यादी यांचा फ्लॅट नं.३३२,बिल्डींग नं.३,क्लोव्हर वॉटर गार्डन सोसायटी,स.नं.६९,रोड नं.७, कल्याणीनगर,पुणे व दि.०५/०७/२०१९ रोजी १४/०० वा.ते दि.०७/०७/२०१९ रोजी ०७/०० वा. चे दरम्यान श्री.मुर्तूजा मसालावाला,रा.फ्लॅट नं.४६२,बिल्डींग नं.४,क्लवोव्हर वॉटर गार्डन कल्याणीनगर,पुणे येथे

**तपशिल** यातील फिर्यादी यांचा फ्लॅट नं.३३२,बिल्डींग नं.३,क्लोव्हर वॉटर गार्डन सोसायटी, स.नं. ६९,रोड नं.७,कल्याणीनगर,पुणे तसेच श्री.मुर्तूजा मसालावाला,रा.फ्लॅट नं.४६२,बिल्डींग नं.४, क्लवोव्हर वॉटर गार्डन,कल्याणीनगर,पुणे या दोघांचा राहता फ्लॅट कुलुप लावुन बंद असताना,कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांचे राहते घराचे मुख्य दरवाजाचे कुलुप कशाचे तरी सहायाने उचकटुन,त्यावाटे आंत प्रवेश करून,बेडरूम मधील कपाटातील सोन्याचे दागिने असा एकुण २,७७,०००/- रुपये किमतीचा ऐवज घरफोडी चोरी करून नेला.

**त.अंमलदार** पो.उप.निरी. बलभीम ननवरे ८२०८०८९४४७

**५**

**पो.स्टे.गुरनं./कलम** चतुःश्रृंगी पो स्टे ६३३/१९,भादविक ३०४,३२३,५०४

**फिर्यादी** श्रीमती.सिमा अनिल पगारे,वय-४२ वर्ष,धंदा-घरकाम,रा.जनवाडी,पुणे

**आरोपी** मयुर ऊर्फ गणेश ज्ञानेश्वर राहणे,वय-३० वर्ष,रा.किलबिल शाळे समोर,जनवाडी,पुणे (अटक)

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** दि.०३/०७/२०१९ रोजी १२/३० वा. फिर्यादी यांचे राहते घरासमोर

**तपशिल** यातील फिर्यादी यांचे पती अनिल रामचंद्र पगारे,वय-५२ वर्ष,रा.घर नं.२४९,जनवाडी, किल बिल शाळे समोर,जनवाडी,पुणे यांनी त्यांचे घरासमोर राहणारे यातील नमुद इसम मयुर ऊर्फ गणेश ज्ञानेश्वर राहणे याचे आईस त्यांचे मानसिक आजाराच्या भरामध्ये शिवीगाळ केल्याचा राग आल्याने,त्याने अनिल पगारे यांचेसोबत हुज्जत घालुन,शिवीगाळ करुन,त्यांचे अंगाशी झटापट करून,त्यांचे भांडणा मध्ये जीन्या शेजारी असणा-या कठड्यावर ढकलुन दिल्याने अनिल पगारे हे कठड्यावर पडुन,त्यांच्या दोन्ही हाताच्या बोटांना व डोक्याला मार लागल्याने,त्यांना ससुन हॉस्पिटल येथे उपचारकामी ॲडमीट केले असता,ते दि.०६/०७/२०१९ रोजी दुपारी १३/०० वा.उपचारा दरम्यान मयत झाले असुन,मयुर उर्फ गणेश राहणे हा फिर्यादी यांच्या पतीचे मरणास कारणीभुत झाला आहे.

**त.अंमलदार** पो.उप.निरी. आर.एस.सरडे ९९२३४०६४७६

**६**

**पो.स्टे.गुरनं./कलम** खडकी पो स्टे २५१/१९,भादविक ३०६,३४

**फिर्यादी** सौ.अक्षता संजय सोनवणे,वय-२८ वर्ष,रा.घर नं.१७,अरूण कुमार वैद्य वसाहत,सुरती मोहल्ला,खडकी,पुणे

**आरोपी** एक पुरूष,वय-२२ वर्ष,रा.घर नं.१६,अरूण कुमार वैद्य वसाहत,खडकी,पुणे (अटक नाही)

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** दि.०१/०७/२०१९ रोजी २२/३० वा.घर नं.१७,अरूण कुमार वैद्य वसाहत,सुरती मोहल्ला, खडकी,पुणे येथे

**तपशिल** यातील फिर्यादी यांची बहीण कु.गौरी अश्रुबा मनेरे,वय-१८ वर्ष,धंदा-नोकरी,रा.सदर हीस कामावरून घरी येण्यास तीला उशीर झाल्याने,तीचा ओळखीचा सहकारी हा तीला राहते घरी सोडवायला घेवुन येत असताना, यातील नमुद इसमाने गौरी हीस अपमानास्पद शब्द वापरून,तीस शिवीगाळ करून,टॉर्चर केल्याने,गौरी हीस तीचे राहते घरी गळफास घेवुन आत्महत्या करण्यास प्रवृत्त केले आहे.

**त.अंमलदार** सहा.पो.निरी. हरीष ठाकुर ८४२४८५२७७५

**७**

**पो.स्टे.गुरनं./कलम** कोरेगांव पार्क पो स्टे २१३/१९,भादविक ४१९,४२०,माहिती व तंत्रज्ञान का.क.६६(क)(ड)

**फिर्यादी** एक पुरूष,वय-५३ वर्ष,रा.कोरेगाव पार्क,पुणे

**आरोपी** अज्ञात व्यक्ती (अटक नाही)

| | |
|---|---|
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि. २०/०८/२०१८ ते दि.२५/०८/२०१८ रोजीचे दरम्यान फिर्यादीचे राहते घरी ऑनलाईन माध्यमाव्दारे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचे औंध शाखा,पुणे येथील बँकेत बचत खाते असुन, सदर बँकेच्या खात्या मधुन नमुद कालावधी मध्ये कोणीतरी अज्ञात इसमाने,पेटीएम द्वारे ऑनलाईन ट्रान्झेक्शन करुन फिर्यादी यांची एकुण ९५,०००/- रुपये रकमेची आर्थिक फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | पोलीस निरीक्षक,(गुन्हे), गणेश माने ९८२३२२६८०३ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**